महाराष्ट्र शासन

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जि. रायगड.**

**जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड, अलिबाग. जि.रायगड**

Email- deangmcalibag@gmail.com Phone No.02141-29921 www.gmchalibag.in/gmch

**जा .क्र.शावैमअ/दरपत्रक/** बॅनर छपाई/ २९८१ /२०२६ दि.१३/०८/२०२६

दरपत्रक मागणी पत्र.

\-----------------

\-----------------

\-----------------.

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड येथील विविध विभागांना विविध कार्यक्रमांकरीता आवश्यक आणऱ्या बॅनरसाठीची दरपत्रके मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत...

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड येथील विविध विभागांना वेगवेगळया कार्यक्रमाकरीता विविध आकाराच्या बॅनर छपाईची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने खालील नमुन्यात मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| Sr. No. | Particulars | Quantity | Unit Price |
|---|---|---|---|
| 1. | कमिटी प्लेक्स बोर्ड विथ फ्रेम | 01 (प्रति चौ.फूट) | Including all taxes |
| 2. | रॅली/आउट डोर प्लेक्स बॅनर विथ आयलेटस | 01 (प्रति चौ.फूट) | |
| 3. | स्टॅन्डी बॅनर | 01 (प्रति चौ.फूट) | |
| 4. | ऑफीस कॅबिन नेम प्लेट | 01 (प्रति चौ.फूट) | |
| | Including all taxes | | Total |

अ.नं.

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफा, दि. २१/०८/२०२७ रोजी ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारत घेतले जाणार नाही / ग्राहय धरले जाणार नाही.

२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग.जि. रायगड यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहरबंद लिफाफयावर "बॅनर छपाई" करीता दरपत्रक लिहुन सादर करावे.

३. लिफाफयावर डाव्या बाजूस दरपत्रक, लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४. न्युनत्तम दरपत्रकचा ग्राहय कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांका पासुन एका (०१) वर्षाकरीता राहील.

५. प्रस्तावित उदिदष्टांकरिता दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीतकमी दराचे दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

६. सदर उदिदष्टांची किंमत, सर्व करांसहीत एकुण किंमत अशी दर्शविण्यात यावी. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

७. दरपत्रक माहोरबंद लिफाफयात सादर करावयाचे दस्ताऐवज (Documents) अधिकृत लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे. १) दुकानाचा परवाना, २) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, ३)जी.एस.टी. क्रमांक पत्र.

८. सदर "बॅनर छपाई" इतर कोणत्या ही शासकीय संस्थेस पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य.

९. ज्या पात्र दरपत्रक धारकाचे दर हे न्यूनतम असतील अशा यशस्वी दरपत्रक धारकास आवश्यकते नुसार "बॅनर छपाई" पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

१०. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणतेही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखून ठेवले आहेत.

११. काम पुर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयकेही अधिष्टाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग जि. रायगड यांचे नावाने देण्यात यावेत. (With Revenue Stump)

१२. देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल.देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब शुक्ल अदा केले जाणार नाही.

१३. वरील नमूद वस्तुंची नग संख्या ही मा. अधिष्ठाता यांच्या आदेशान्वये /प्रशासकीय उपलब्धतेनुसार कमी किंवा वाढवली जाऊ शकते.

१४. पुरवठा धारकाचे पूर्ण नाव, भ्रमणध्वनी आणि संपूर्ण पत्ता, संकेतांक क्र. (Email address along with Website) हा Envelope वर नमूद असणे आवश्यक आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग रायगड

प्रत - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या सुचना फलकावर दरपात्रक मागविण्या संदर्भात दिनांक :- १३/०८/२०२६ सुचना देण्यात आल्या आहेत.